IIF-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154190

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र , जिल्हा मुंबई , पोलीस ठाणे (आझाद मैदान?), मुंबई , पहिली खबर क्र. 29/2022 वर्ष 2022, दिनांक 4/6/2022
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम १९८८ , कलमे Sections 6
(ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार ............, तारीख पासून 29/6/2022 वेळ 12:00 , तारीख पर्यंत 4/6/2022 वेळ 15:40 वा
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख 29/6/2022 वेळ 12:00 वा
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 04/2022 तारीख 4/6/2022 वेळ 6:20 वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी , लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ............
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव इमारत व कारखाने विभाग, तिसरा मजला, कक्ष क्र. 309, कार्यकारी अभियंता कार्यालय, डी विभाग, मनपा कार्यालय, नाना चौक
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण जोबनपुत्र कंपाऊंड, गाव ......, पोस्ट मुंबई - ४०० ००६, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ............, तालुका ......, जिल्हा ......, राज्य ......
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव श्री. कांतीलाल बोरा (b) वडिलांचे / पतीचे नाव फुलचंदजी बोहरा
Name Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय 62 वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. 9869179703
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ............, दिल्याचा दिनांक ............ दिल्याचे ठिकाण ............ (f) व्यवसाय धंदा (गाड्यांचे स्पेअरपार्ट्स विक्रेता)
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू जात Caste ............ जनजात Sub-Caste ............
(h) पत्ता 66, न्यू म्युनिसिपल बिल्डींग, पहिला मजला, रुम क्र. 36, शुक्लाजी
Address : Ward House/Name No. Phone/Mo. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव स्ट्रीट, कामाठीपुरा, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ............, गाव ............, पोस्ट ............, पो. स्टे. ............
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ............, जिल्हा मुंबई - 08 राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता वरीलप्रमाणे
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
1) अमोल चंद्रकांत पवार वय 30 वर्षे पद सहाय्यक अभियंता 2) दत्तात्रय संभाजी माने, वय 36 वर्षे, दुय्यम अभियंता, नेमणूक कार्यकारी अभियंता कार्यालय इमारत व कारखाने विभाग, डी वार्ड, बृहन्मुंबई, मनपा कार्यालय, जोबनपुत्र कम्पाउंड, नाना चौक, मुंबई-४०० ००६

# फिर्याद

फिर्यादी श्री. कांतीलाल पुखराजजी वोहरा वय ६२ वर्षे धंदा - व्यवसाय (गाड्यांचे स्पेअर पार्टस विक्रेता) रा. रुम नं. ७६, न्यु म्युन्सिपल बिल्डिंग, पहिला मजला, रुं. नं. ३६, शुक्लाजी इस्टेट, कामाठीपुरा मुं. नं. ०८ यांची सविस्तर फिर्याद स्वतंत्र कागदावर नमुद करण्यात आली असून तीच गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष
[signature] 05/07/2022
(संप्रिया नटे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई.

Kantilal.

फिर्याद दिनांक – ०५/०७/२०२२

मी कांतीलाल पुखराजजी बोहरा, वय ६२ वर्षे, धंदा – राज रतन आटोमोबाईलस् (वाहनाचे स्पेअर पार्ट विकणे), रा.ठी. ७६ न्यु म्युनिसिपल बिल्डीग, पहिला माळा, रुम ३६, शुक्लाजी स्ट्रीट, कामाठीपुरा, मुंबई – ०८ मो.क्र ९८६९१२४७१३, आधार कार्ड नं. ५५७० ९७७१ १६३२, पॅन नं. AABPB6531E

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कटुंबियांसह गेल्या ३७ वर्षापासुन राहतो. मी माझी पत्नी सौ कमलादेवी, ३ मुले भरत, राजेश, भावेश यांच्यासह राहत असून मुलगी करिष्मा हिचे लग्न झाले आहे. वाहनाचे स्पेअर पार्ट विकून मिळणाऱ्या उत्पनावर आमचा उदरनिर्वाह चालतो.

माझे राजरतन ऑटोमोबाईलस्, १४६ अर्दस हाऊसिंग सोसायटी, दुकान न. ०१ अली भाई प्रेमजी रोड, ग्रॅन्ट रोड, मुंबई ०७ येथे दोनचाकी वाहनाचे स्वतःचे स्पेअर पार्टचे दुकान आहे. दुकानाच्या पाठीमागे माझ्या दुकानालगत सोसायटीमधील सामाईक जागेमध्ये आजूबाजूच्या बिल्डींगमधील लोक कचरा टाकतात त्यामुळे पावसाळयामध्ये त्याचा त्रास होतो. तसेच लवकरच पावसाळा सुरू होणार असल्यामुळे सदर ठिकाणी पडणाऱ्या कचऱ्यामुळे त्रास होवु नये म्हणुन मे महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये मी सदर ठिकाणी पावसाळी शेड टाकण्याचा विचार केला. त्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेची परवानगीची आवश्यकता होती. त्याकरीता रितसर परवानगी मिळावी म्हणून मी संबधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या डी वार्ड कार्यालय नानाचौक, ग्रॅट रोड येथील इमारत व कारखाने विभागामध्ये पावसाळी शेडच्या परवानगी बाबतचा अर्ज देणेकरीता गेलो असताना सदर ठिकाणी लोकसेवक दत्तात्रय माने यांची भेट झाली. त्यावेळी मी त्याच्याकडे नमुद पावसाळी शेडबाबत विचारणा केली असता त्यांनी माझ्याकडे रु २,००,००० (अक्षरी रु. दोन लाख फक्त) लाचेची मागणी केली. सदरची लाचेची रक्कम मला दयावयाची नसल्याने मी माझ्या मुलाचा मित्र व सामाजिक कार्यकर्ते अर्जून रमेश जाधव यांच्याकडे लाचेबाबत कशी तक्रार करायची याबाबत विचारणा केली व त्यांनी सागितल्याप्रमाणे दि. २१/०६/२०२२ रोजी मा. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचे कार्यालयात येऊन सब इंजिनिअर श्री. माने यांचेविरुध्द लेखी तक्रार दिली. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला पुढे करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत थोडक्यात माहिती दिली. परंतु माझ्या वैयक्तिक अडचणीमुळे मी दिनांक २२/०६/२०२२ व दिनांक २३/०६/२०२२ रोजी कारवाई कामी हजर राहू शकत नसल्याने सदरची कारवाई दि. २४/०६/२०२२ रोजी करण्यात येणार असल्याचे पो.नि. नटे यांनी सांगितले.

दि. २४/०६/२०२२ रोजी सकाळी १२.३० वाजता मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात हजर झालो. त्यावेळी पो.नि. सुप्रिया नटे यांनी पोलीस पथकातील स.पो.आ. उमेश पाटील, दोन सरकारी पंच श्री. राकेश विजय जिवने व श्रीमती आशा शंकर गांगुर्डे, पोलीस पथकाची माझेशी ओळख करुन दिली.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे हया मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर मी, पो.नि. सुप्रिया नटे, स.पो.आ. पाटील दोन पंच व मपोशि शिगवण पो.ना. गायकवाड पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह खाजगी वाहनांमधुन लोकसेवकास भेटण्यासाठी डी. वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, नानाचौक, ग्रॅट रोड, मुंबई च्या दिशेने गेलो. सदर वाहन सरपोचखानवाला रोडने निघून एम.एल. डहाणूकर लेन, अंजता अपार्टमेंन्टजवळ थाबंले. तेथे पो.नि. सुप्रिया नटे यांनी पो.ना. गायकवाड यांच्या मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लावला. त्यांनतर मी, व पंच श्री. राकेश जिवने असे लोकसेवकास भेटण्यासाठी इमारत व कारखाने विभाग, डी. वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, नानाचौक, ग्रॅट रोड, मुंबई येथे टॅक्सीने जावुन भेट घेतली असता लोकसेवक श्री. माने यांनी शेड बाधंण्याच्या ठिकाणी भेट दिली नसल्याबाबत सांगून ते नमुद ठिकाणी प्रथम भेट देतील असे सांगितले. तसेच मला सोमवारी किंवा बुधवारी पुन्हा भेटायला बोलाविले म्हणून त्यानंतर मी व पंच क्रमांक ०१ असे सापळा पथक ज्या ठिकाणी थांबले होते त्याठिकाणी आलो. त्यावेळी पो.नि. सुप्रिया नटे यांनी माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यातील माझे व लोकसेवक यांचेतील संभाषण ऐकुन त्याबाबत ला.प्र.वि. कार्यालयात गेले नंतर ट्रान्सक्रिप्ट व पंचनामा तयार करण्यात येईल व त्यांनी सदरची कारवाई स्थगीत केल्याचे सांगितले. सदर बाबत पो.नि. सुप्रिया नटे यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर दि. २९/०६/२०२२ रोजी मी १०.४० वा. पो.नि. सुप्रिया नटे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी लाचलुपचत प्रतिबंधक विभाग कार्यालयात हजर झालो. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे हया मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील

Kantilal

मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर मी, पो.नि. सुप्रिया नटे, स.पो.आ. पाटील, दोन पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह शासकीय वाहनांमधुन लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयाकडे रवाना झालो. सदर वाहन सरपोचखानवाला रोडने निघून एम.एल. डहाणूकर लेन, अंजता अपार्टमेंन्टजवळ थांबले. तेथे पो.नि. सुप्रिया नटे यांनी पो.ना. गायकवाड यांच्या मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लावला. त्यांनतर मी, व पंच श्री. राकेश जिवने असे लोकसेवकास भेटण्यासाठी इमारत व कारखाने विभाग, डी. वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, नानाचौक, ग्रँट रोड, मुंबई येथे टॅक्सीने जावुन भेट घेतली असता सदर ठिकाणी लोकसेवक माने यांच्याशी माझी भेट झाली. त्यावेळी त्याचे सोबत मी माझ्या दुकानाच्या मागील बाजूस बांधावयाचे पावसाळी शेड त्यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक माने यांनी मला नमुद ठिकाणी कोणाची तक्रार येईल किंवा कसे याबाबत विचारण केली. तसेच त्यांनी सकाळी त्यांची अर्जूनशी भेट झाली त्यावेळी त्याने मला मदत करणेबाबत लोकसेवक माने यांना सागितले. नमुद वेळी  अर्जूनने मला काही पेमेण्ट बाबत माहिती दिली का अशी विचारणा देखील त्यांनी केली नमुद वेळी लोकसेवक माने यांनी मला तात्पुरते पावसाळी शेड म्हणून बाबूं व ताडपत्रीची शेड टाकण्यास सांगून तक्रार आल्यानंतर बघून घेता येईल काय करायचे असे सागितले. लोकसेवक माने यांनी अर्जूनशी याबाबत बोलणी केली असून **'अर्जून को मॅसेज दिया है वो खतम करो ना....और बनाना चालू कर देना'** असे बोलून त्याने सांगितल्याप्रमाणे काम करण्यास सागितले. सदरवेळी प्रथम माझे काम करून पुढचे कसे काय करायचे ते पाहता येईल असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री. माने यांनी मला तात्पुरती **' पावसाळी शेड बांधण्याकरीता कोणतेही ॲप्लिकेशन करू नका '** असे देखील सांगितले. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक ज्या ठिकाणी थांबले होते त्याठिकाणी आलो असता पो.नि. सुप्रिया नटे यांनी पो.ना. गायकवाड यांच्या मदतीने माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यातील माझे व लोकसेवक यांचेतील संभाषण ऐकुन त्याबाबत ला.प्र.वि. कार्यालयात ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात येईल व त्यांनी सदरची कारवाई स्थगीत केल्याचे सांगितले. सदर बाबत पो.नि. सुप्रिया नटे यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

दरम्यान दिनांक २९/०६/२०२२ रोजी माझ्या मुलाचा मित्र अर्जून रमेश जाधव यांने मला सागितले की, दिनांक २९/०६/२०२२ रोजी तो त्याचे कामानिमीत्त इमारत व कारखाने विभाग, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, डी वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका, नानाचौक, मुंबई येथे गेला असताना त्यांची लोकसेवक दत्तात्रय माने यांच्याशी भेट झाली. सदर वेळी दत्तात्रय माने यांनी माझे पावसाळी शेडबाबत त्यांच्याशी चर्चा केली त्यावेळी अर्जून जाधव यांनी लोकसेवक माने यांना मला सहकार्य करण्याबाबत विनंती केली असता नमुद परवानगी करीता मला रु २,००,०००/– इतक्या रक्कमेची व्यवस्था करावी लागेल असे सागितल्याचे सागितले. त्याचदिवशी त्यांचा लोकसेवक माने यांच्याशी मोबाईलवर संपर्क झाला असता लोकसेवक माने यांनी त्यांची व माझी भेट झाल्याची माहिती अर्जूनला दिली. तसेच पावसाळी शेडच्या कामासंदर्भात पुन्हा भेटण्याकरीता मला अर्जूनसोबत त्यांच्या कार्यालयात बोलाविले असल्याचे अर्जूनने मला सांगितले. त्याबाबतची माहिती मी पो.नि. सुप्रिया नटे यांना दिली. त्यामुळे दिनांक ०१/०७/२०२२ रोजी पुढील पडताळणी कारवाई करण्यात येणार असलेबाबतची माहिती पो.नि. नटे यांनी आम्हाला दिली. नमुद पडताळणी करीता आमचे सोबत अर्जून जाधव हे देखील सहभागी होतील यांची माहिती पो.नि. नटे यांनी दिली.

त्यानंतर दि. ०१/०७/२०२२ रोजी मी ११.०० वा. पो.नि. सुप्रिया नटे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी व अर्जून रमेश जाधव यांच्यासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात हजर झालो. पडताळणी करीता आवश्यक कार्यालयातील सर्व कारवाई पूर्ण झाल्यानंतर पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह शासकीय वाहनांमधुन लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयाकडे रवाना झालो. सदर वाहन सरपोचखानवाला रोडने निघून एम. एल. डहाणूकर लेन, अंजता अपार्टमेंन्टजवळ थाबंले. तेथे पो.नि. सुप्रिया नटे यांनी पो.ना. गायकवाड यांच्या मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बनियानला लावला. त्यांनतर मी, अर्जून जाधव व पंच श्री. राकेश जिवने असे लोकसेवकास भेटण्यासाठी इमारत व कारखाने विभाग, डी. वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, नानाचौक, ग्रँट रोड, मुंबई येथे गेलो असता सदर ठिकाणी लोकसेवक माने यांची भेट झाली त्यांनी आम्हाला श्री. अमोल थविल, असि. इजिनिअर यांच्या दालनात थाबण्यास सागितले. काही वेळाने लोकसेवक माने

समक्ष,

05/07/22

(सुप्रिया नटे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

Kan+11/4

देखील तेथे आले. नमुद भेटी दरम्यान माने साहेबानी व अर्जून जाधव यांनी माझी लोकसेवक अमोल थविल याच्याशी ओळख करून दिली. नमुद भेटी दरम्यान मला बाधावयाच्या पावसाळी शेडबाबत त्यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक माने व लोकसेकव थविल यांनी सदर शेडबाबत कोणत्याही प्रकारची खाजगी अथवा इमारतीतील लोकांची तक्रार नाही आली पाहिजे व जर कोणी तक्रार केली तर त्यांचे जे काही आहे ते मला पाहावे लागेल अशी समज मला दिली. नमुद भेटी दरम्यान पावसाळी शेडच्या परवानगीकरीता लोकसेवक श्री. थविल यांनी कॅलक्यूलेटरवर अंकामध्ये २००००० अशी संख्या दाखवली व मला उद्देशून ' त्याला सांग....हेच बोललो होतो ना आपण....' असे लोकसेवक माने यांना सागितले. त्यावेळी मी न समजून ' कितना ' अशी विचारणा केली असता लोकसेवक श्री. माने यांनी प्रथम दोन असे सागितंले. त्यावेळी मी पुन्हा मला समजले नसले बाबत सागितले असता लोकसेवक माने यांनी 'दोन लाख' असे म्हणून रु दोन लाख लाचेची मागणी केली. त्यावेळी मी सदरची रक्कम खुप जास्त असून कमी करण्याची विनंती केली असता लोकसेवक माने यांनी **' अभी बता दिया... काय हयाच्यात कमी होऊ शकत नाही उलट तू रेफ्ररन्स आलाय आणि ती रिक्स आहे... तिथे...'** असे म्हणून सदरची रक्कम कमी होणार नाही असे सागितले. तसेच साहेब तर जास्त सांगत होते. परंतु मी सागितले म्हणून कमी केले असे लोकसेवक माने यांनी सागितले. लोकसेवक श्री. थविल यांनी **' मी जास्त सांगत होतो त्याला म्हणून कितीचा आकडा म्हणून मी कॅलक्यूलेट करत होतो. '** असे म्हणून लोकसेवक माने यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला व त्यांनी माझे समक्ष मागणी केलेली रक्कम कॅलक्यूलेटरवर दाखविले बाबत देखील सागितले. त्यानंतर मी लोकसेवक यांच्याकडे खुप विनंती केल्यानंतर त्यांनी दोन लाखामधून १० हजार कमी करून एकुण रु १,९०,०००/– इतकी रक्कम सोमवारी घेऊन येण्यास सागितले. त्यावेळी लोकसेवक थवील यांनी देखिल ठीक आहे म्हणुन लाचेच्या मागणी केलेल्या रक्कमेबाबत सहमती दर्शविली. नमुद वेळी अर्जून सोबत येण्यास सागितले व येण्यापूर्वी अर्जूनला त्यांच्या मोबाईलवर फोन करण्यास सागिंतले. सदर बाबत पो.नि. सुप्रिया नटे यांनी सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दि. ०४/०७/२०२२ रोजी १२.३० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय येथे मी अर्जून जाधव याच्यासह हजर झालो. त्यावेळी पो.नि. नटे यांनी सापळापुर्व/सापळा कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती दिली. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाई बाबतची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे हया मला व दोन्ही सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये गेल्या. तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन्ही पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर लोकसेवक माने यांनी सांगितल्याप्रमाणे अर्जुन याचे मोबाईल क्रमांक ९३२४४३२४५४ वरून लोकसेवक माने यांचे मोबाईल क्रमांक ९८३३५५९८८७ वर फोन करण्यात आला. सदरचा कॉल हा डीव्हीआर चे सहाय्याने ध्वनिमुद्रीत करण्यात आला आहे. नमुद संभाषणादरम्यान अर्जुन यांनी लोकसेवक माने यांनी सांगितल्याप्रमाणे ते येत असल्याचे सांगितले असता त्यांनी त्यांचे कार्यालयामध्ये येण्यास सांगितले.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला लोकसेवक दत्तात्रय माने व अमोल थविल यांना दयावयाचे रु. १,९०,०००/– ( अक्षरी रु. एक लाख नव्वद हजार फक्त ) लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता एवढी रक्कम माझ्याकडे नसल्याचे त्यांना सांगितले व मी माझे कडील बचतीतील भारतीय चलनाच्या रु. २०००/– दराच्या २१ नोटा, रु ५००/– दराच्या १६ नोटा अशा एकुण रु. ५०,०००/– (अक्षरी रु. पन्नास हजार) त्यांचेकडे दिले.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी त्यांचेकडील रू.२०००/– दराच्या खेळण्यातील बनावट नोटा रु. १,४०,०००/– (अक्षरी एक लाख चाळीस हजार फक्त) एकुण ७० टॉय नोटा असल्याचे सांगुन ते लाचेकरीता वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. नमुद वेळी मी दिलेल्या रू ५०,०००/– मधील भारतीय चलनाच्या रु. २०००/– दराच्या २१ नोटा, रु ५००/– दराच्या १६ ची झेरॉक्स काढण्यात येवुन त्याचेवरील नोटांचे नंबर सापळा पथकातील अंमलदार यांचे मदतीने नोंद करण्यात आले. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी तेथे उपस्थीत असलेले पोलीस अंमलदार यांची ओळख पो.ह.क्र. ९६०२६४/श्री. शेमडकर अशी करुन दिली. तसेच पो.ह. शेमडकर यांनी अॅथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. व त्याबाबतचे प्रात्याक्षिक देखिल दाखविले. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांचे सुचनेनुसार तेथे हजर

समक्ष,
05/07/22
(सुप्रिया नटे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

Kantilal

असलेले पो.ह. शेमडकर यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली. त्यानंतर सदर लाचेची रक्कम एका खाकी रंगाच्या कागदाच्या लिफाफामध्ये ठेवली. नमुद लिफाफ्याचे दोन्ही बाजुस पोह शेमडकर यानी अॅन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर सदरचा लिफाफा पो.ह. शेमडकर यांनी अलगदपणे माझे पॅन्टचे उजव्या बाजुचे समोरील खिशात ठेवली व ते सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले. नमुद वेळी पोनि सुप्रिया नटे यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाचे दक्षतेबाबत मला तसेच पंच क्र १ यांना माहिती दिली. लोकसेवक माने व लोकसेवक थविल यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यास उजवा हात वर करून अंगठयाने थंब करुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे मला सांगितले. त्यानंतर पोलीस पथक डी वार्डच्या कार्यालयात कोणासही संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर मी, दोन सरकारी पंच, पो.नि. सुप्रिया नटे, स.पो.आ. उमेश पाटील व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील सर्व आवश्यक ती कारवाई झालेनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथुन दोन शासकीय वाहनात बसून रवाना झालो. त्यानंतर सदर वाहने सरपोचखानवाला रोडने एम.एल. डहाणूकर लेन, अंजता अपार्टमेंन्टजवळ थांबविण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे, यांनी मला योग्य त्या सुचना देवून पो.ना. गायकवाड यांच्या मदतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या शर्टच्या आतील बाजु वरील खिशात लावला. त्यानंतर मी, अर्जून जाधव व पंच श्री. जिवने असे लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो. आम्ही लोकसेवक माने यांची त्यांचे कक्षात भेट घेतली असता सदर वेळी मी लोकसेवक माने यांना त्यांनी सांगितल्याप्रमाणे रूपये १,९०,०००/- आणली असल्याची माहिती त्यांना दिली. त्यावेळी लोकसेवक माने यांनी मला सदरची रक्कम एन्वलपमध्ये आणली किंवा कसे याबाबत विचारणा केली असता मी त्यांना सदरची रक्कम एन्वलपमध्ये आणल्याबाबत सांगितले. त्यावेळी त्यांनी सदरची रक्कम असलेले एन्वलप हे त्यांचे टेबलचे बाजुला असलेल्या लोखंडी रॅकमधील ट्रे मध्ये ठेवण्यास सांगितले व त्यावर फाईल ठेवण्यास सांगितले. त्यावेळी मी सदर लाचेची रक्कम असलेले एन्वलप हे आलोसे माने यांनी सांगितलेल्या रॅकमधील वरून दुसऱ्या कप्प्यातील हिरव्या व निळया रंगाच्या एकात एक घातलेल्या प्लास्टिकच्या ट्रेमधील फाईलच्या आत ठेवले. नमुद वेळी लोकसेवक माने यांनी मला **'कितना है वो'** अशी विचारणा केली असता मी त्यांना **वन नायन्टी पुरा** असे म्हणुन एक लाख नव्वद हजार इतकी रक्कम असल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी लोकसेवक माने यांनी **'तो बंडल इतना छोटा क्युं'** याबाबत विचारणा केली असता मी त्यांना त्यामध्ये दोन हजाराच्या नोटा असल्याची माहिती दिली. त्यानंतर मी त्यांना माझे कामामध्ये कोणतीही अडचण येणार नाही ना याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला कोणतीही अडचण येणार नाही याबाबत विश्वास दिला. नमुद वेळी मी थवील साहेबांबाबत विचारणा केली असता त्यांनी ते कोर्टमध्ये गेले असल्याबाबत माहिती दिली. त्यानंतर मी सदर ठिकाणाहुन बाहेर येवुन सापळा पथकास दिसेल अशा पद्धतीने उजवा हात वर करून अंगठयाने थंब करुन पुर्वनियोजीत इशारा केला असता सापळा पथकातील अंमलदार यांनी लोकसेवक दत्तात्रय माने यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. त्यानंतर पोनि सुप्रिया नटे यांनी दिलेल्या सुचनेनुसार लोकसेवक दत्तात्रय माने यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक ९८३३५५९८८७ वरून लोकसेवक श्री अमोल थविल यांचा मोबाईल क्रमांक ९८२०५२८०६८ वर संपर्क केला असता नमुद वेळी प्रथम करण्यात आलेला कॉल अर्धवट बोलणे होवुन कट झाला. त्यानंतर पुन्हा वर नमुद प्रमाणे लोकसेवक माने यांनी त्यांचे मोबाईलवरून लोकसेवक थवील यांचे मोबाईलवर संपर्क केला असता नमुद संभाषणा दरम्यान लोकसेवक माने यांनी लोकसेवक थविल यांना मी त्यांना पाकीट दिल्याबाबत माहिती दिली. व सदरचे पाकीट त्यांचेकडे द्यायचे का याबाबत विचारणा केली असता लोकसेवक थवील यांनी ते पंधरा ते वीस मिनीटांमध्ये कार्यालयात येत असल्याची माहिती दिली. त्यामुळे मी, पंच व सर्व सापळा पथक हे नमुद कार्यालयामध्ये कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबुन राहीलो. काही वेळाने लोकसेवक अमोल थविल हे त्यांचे कार्यालयामध्ये आल्यानंतर मी व पंच क्र १ जीवने असे त्यांना भेटणेकरीता त्यांचे केबीनमध्ये गेलो. नमुद वेळी त्यांना एक लाख नव्वद हजार रूपये त्यांचे कार्यालयातील लोकसेवक माने यांना दिले असल्याची माहिती दिली असता त्यांनी सदरबाबत माने यांनी त्यांना सांगितल्याची माहिती दिली. त्यावेळी मी त्यांना मला माझे कामामध्ये कोणतीही अडचण येणार नाही ना याबाबत विचारणा करून माझे काम होईल का असे विचारले असता त्यांनी माझे काम होईल असे आश्वासन मला दिले. त्यांनी थोड्यावेळातच लोकसेवक माने यांना बोलावुन घेतले. काही वेळाने लोकसेवक माने हे सदर

समक्ष
05/07/22
(सुप्रिया नटे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

Kanti lal

ठिकाणी आले व त्यांनी माझेकडुन पैसे घेतल्याची माहिती लोकसेवक थविल यांना दिली. त्यावेळी अचानक लोकसेवक थविल सदर ठिकाणाहुन निघुन बाहेर जावु लागताच लोकसेवक थविल यांनी माझे कडुन रू १,९०,०००/– इतक्या लाचेची मागणी करून सदरची रक्कम त्यांचे वतीने लोकसेवक माने यांनी स्विकारले वरून लोकसेवक थविल यांना देखिल सापळा पथकाने ताब्यात घेतले.

लोकसेवक श्री अमोल चंद्रकांत थविल, सहाय्यक अभियंता व लोकसेवक श्री. दत्तात्रय संभाजी माने, दुय्यम अभियंता यांनी माझ्या दुकानाच्या पाठीमागे सोसायटीमधील सामाईक जागेमध्ये दुकानालगत पावसाळी शेड बांधण्यासाठी परवानगी देण्यासाठी अप्रामाणिकपणे रु २,००,०००/– इतक्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती रु. १,९०,०००/– ( अक्षरी रु. एक लाख नव्वद हजार फक्त) इतक्या रक्कमेची मागणी करून तीच रक्कम गैरलाभ म्हणुन लोकसेवक माने यांनी स्वत:करीता व लोकसेवक अमोल थवील यांचेकरीता स्विकारले, लोकसेवक अमोल थविल यांनी त्यास दुजोरा दिला म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे, लोकसेवक श्री अमोल थविल व लोकसेवक श्री. दत्तात्रय माने यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला माझ्या मुलाचा मित्र व सामाजिक कार्यकर्ते अर्जून रमेश जाधव यांने मराठीत वाचून हिंदीत समजावून सांगितली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

[signature] 05/07/22

(सुप्रिया नटे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

Kantilal

Kantilal. Pukhraji Bohra.

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... तात्काळ ......

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..............................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... 1,00,000/- ......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..............................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारिख, वेळी व ठिकाणी आरोपी लोकसेवक अमोल चंद्रकांत थविल सहाय्यक अभियंता व आलोसे दत्तात्रय तुकाराम माने, दुय्यम अभियंता, मनपा, 'डी' विभाग, मुंबई यांनी फिर्यादी यांचे दुकानाचे पाठिमागे सोसायटीच्या सामाईक जागेत कुणालाही यावसाठी शेड बांधण्याकरीता परवानगी त्याकरीता अप्रामाणिकपणे रु 2,00,000/- इतक्या रकमेची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु 1,00,000 त्या रकमेचा लाचेचा गैरलाभ म्हणून आलोसे क्र 2 माने यांनी स्वतःकरीता व आलोसे क्र. 1 थविल यांचेकरीता स्विकारले व आलोसे क्र 1 यांनी त्यास दुजोरा दिला म्हणून आलोसे क्र. 1 व 2 यांचेविरुद्ध भ्र. प्र. अधिनियम 1988 कलम 7 अन्वये गुन्हा दाखल म्हणून नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोलीस निरीक्षक सुप्रिया नटे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..............................................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..................., जिल्हा ..................., राज्य ...................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..............................................

District................................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.) Kantilal

05/01/2022

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name सुप्रिया पिरजा नटे

पदनाम Rank पोलीस निरीक्षक, लाप्रवि, मुंबई

तपासिक अं. चा कोड क्र. ..............................

Posting

Code No. of I. O. ..............................

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख...................

1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report